# *बृहन्मुंबई महानगरपालिका*

# घन कचरा व्यवस्थापन खाते


**केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५**

**अंतर्गत**

**पोटकलम ४(१) (बी) अन्वये**

*घन कचरा व्यवस्थापन*

**खात्याची माहिती**



**नियमपुस्तिका - ४**

**घन कचरा व्यवस्थापन खात्याची**

**कार्ये पार पाडण्याकरीता तयार करण्यात आलेली प्रमाणके**

**(दि. 31.3.2015 पर्यंत सुधारीत)**

**घन कचरा व्यवस्थापन खात्याने नागरिकांच्या दृष्टीकोनातून खात्यांतर्गत पुढील प्रमाणे प्रमाणके तयार करण्यात आलेली आहेत.**

❖ **साफ अंगणाची हमी देण्यासाठी अस्वच्छता पसरविण्यास आणि कचरा टाकण्यास प्रतिबंध-**

१. **सार्वजनिक जागेत अस्वच्छता पसरविणे** :- कोणत्याही व्यक्तिने अधिकृत सार्वजनिक अथवा खाजगी कचरा कुंडयां व्यतिरिक्त अन्य कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकता किंवा जमा करता कामा नये.

२. **खाजगी मालमत्तेच्या ठिकाणी कचरा टाकणे** : कोणत्याही व्यक्तीने अधिकृत खाजगी किंवा सार्वजनिक कचरा कुंडयां व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्याप्त, मोकळया किंवा रिकाम्या खाजगी मालमत्तेच्या वास्तव असलेल्या अथवा नसलेल्या ठिकाणी कचरा टाकू किंवा जमा करू नये.

३. **वाहनांतून फेकला जाणारा कचरा** : वाहनातील, वाहन चालक किंवा प्रवासी कोणीही व्यक्ति चालत्या किंवा स्थिर वाहनातून कोणत्याही रस्त्यावर, मार्गावर, पदपथ, खेळाची मैदाने, उद्याने, रहदारीच्या जागा, किंवा अन्य सार्वजनिक ठिकाणी कचरा फेकणार किंवा जमा करणार नाही.

४. **वाहतूकीच्या वाहनातून सांडणारा कचरा** : कोणतीही व्यक्ति, कचरा वाहतूकीसाठी त्यात भरलेला केरकचरा सांडण्यास, उडून जाण्यास, अथवा रस्ता, पदपथ, रहदारीच्या जागा, खेळाचे मैदान, उद्यान किंवा अन्य सार्वजनिक ठिकाणी जमा होण्यास प्रतिबंध होईल अशा पध्दतीने रचना असलेल्या वाहनांव्यतिरिक्त, इतर वाहन चालविणार किंवा हलविणार नाही.

५. **सार्वजनिक उपद्रव निर्माण करणे** : कोणीही व्यक्ति, खालील विशिष्ट कारणांसाठी पुरविण्यात आलेल्या सार्वजनिक सुविधा किंवा सुखसोयी वगळता

अन्य कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी अंघोळ करणे, थुंकणे, मलमूत्र विसर्जित करणे, प्राणी किंवा पक्षांना खाण्यास देणे, वाहने, भाडी किंवा अन्य कोणतीही वस्तू दुरूस्त करणे / धुणे, ही कामे करणार नाही किंवा कोणत्याही प्रकारची साठवण ठेवणार नाही.

६. **साफ अंगणची हमी** : प्रत्येक मालक अथवा भोगवटादार निवासी जागेव्यतिरिक्त स्वच्छ अंगण परिरक्षित ठेवण्यास जबाबदार राहील.

❖ **नागरी घनकच-याचे वर्गीकरण, साठवण, पुरवठा आणि संकलन –**

१. सहा विशिष्ट प्रकारात कच-याचे वर्गीकरण – नागरी घन कच-याची निमिर्ती करणा-या प्रत्येकाने खाली निर्देशित केलेल्या सहा वेगवेगळया प्रकारांमध्ये कच-याचे वर्गीकरण करून, तो वेगवेगळा साठवला पाहिजे व असा वर्गीकरण केलेला कचराच, अधिकृत साठवणी केंद्राकडे नेण्यासाठी तयार ठेवला पाहिजे.

कच-याच्या वर्गीकरणाचे प्रकार –

- जैविक विघटनशील (ओला) कचरा
- घरगुती विशिष्ट घातक घन कचरा
- जैविक वैदयकीय कचरा
- बांधकाम आणि निष्कांसन यातून निर्माण होणारा कचरा
- झाडांच्या छाटणीसह उद्यान आणि बाग कामातून निर्माण होणारा कचरा
- पुनर्चक्रांकन करण्याजोग्या आणि पुनर्चक्रांकन न करणयाजोग्या कच-यासह इतर सर्व अजैविक विघटनशील कचरा (सुका कचरा)

  महानगरपालिका आयुक्त हया उपविधीच्या अंमलबजावणीसाठी प्रथमतः उपरोक्त वर्गीकरण मर्यादित करून तसेच कचरा निर्माण करणा-यांमधील जागरूकतेची पातळी व शहरातील पायाभूत आधारांची उपलब्धता विचारात घेऊन स्वतंत्रपणे विविध टप्पे अधिसूचित करतील.

२. कच-याची कोणत्याही प्रकारची मानवी हाताळणी न करता किंवा तो न सांडता त्याचे सुरक्षितरित्या आणि सहजपणे संकलन व्हावे म्हणून विविध प्रकारच्या घन कच-याची साठवण आणि पुरवठा करण्यासाठी महापालिका आयुक्त अनिवार्य रंगसंहिता आणि अन्य विहित कचरा कुंडयांचा तपशील वेळोवेळी स्वतंत्रपणे अधिसूचित करतील आणि तो विविध प्रकारचा घन कचरा निर्माण करणा-यास बांधिल राहिल.

३. **वर्गीकरण करण्यात आलेल्या कच-यात पुरवठा** : कुठल्याही जमिनीवर अथवा मालमत्तेमध्ये जमा झालेला कचरा गोळा करून व त्याचे वर्गीकरण करून तो महापालिकेने कचरा गोळा करण्यासाठी नेमलेल्या कर्मचा-याकडे सुपूर्द करणे अथवा कचरा गोळा करण्यासाठी नेमलेल्या वाहनांत टाकणे, हे त्या जमिनीच्या अथवा मालमत्तेच्या मालकाचे अथवा भोगवटादाराचे कर्तव्य राहील.

४. **जैविक विघटनशील कचरा** : म्हणजे वर्गीकरण करण्यात आलेला जैविक विघटनशीलनागरी घन कचरा (सूचि दोन मधील स्पष्टीकरणात्मक यादीप्रमाणे) जर कचरा निर्माण करणा-याकडून त्याचे खत करण्यात आले नाही तर, त्याने असा कचरा त्याच्या जागेत साठवावा आणि प्रत्येक कचरा निर्माण करणा-याने हा कचरा घंटागाडीत किंवा मोठया प्रमाणावर जैविक विघटनशीलकचरा संकलित करणा-या वाहनात किंवा संबंधित सहाय्यक आयुक्त हयानी वेळोवेळी अधिसूचित केल्याप्रमाणे मुंबई महानगरपालिकेने ठरविलेल्या ठराविक वेळी कचरा दिला जात आहे याची खातरजमा करावी.

५. **सर्व कचरा निर्माण करणा-यांकडून खतनिर्मिती** : कच-याचे परिवहन कमी करण्यासाठी कच-यापासून स्थानिक खतनिर्मिती करण्यास उत्तेजन देण्यात येईल.

६. **विनिर्दिष्ट घरगुती धोकादायक कचरा** : (अनुसूची तीन मध्ये दिलेल्या यादीनुसार) – प्रत्येक कचरा निर्माण करणा-याने असा धोकादायक कचरा साठवून तो कचरा संकलित करण्यासाठी मुंबई महानगरपालिकेकडून किंवा

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून प्राधिकारित करण्यात आलेल्या अन्य कोणत्याही अभिकरणाद्वारे साप्ताहिक / ठराविक कालावधीने पुरविण्यात येणा-या संकलन वाहनात किंवा महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून अनिवार्य करण्यात आल्याप्रमाणे अशा कच-याची पध्दतशीर विल्हेवाट लावण्यासाठी तो कचरा संकलित करण्याकरीता नियोजित केलेल्या केंद्रावर नेऊन दिला पाहिजे.

७. **प्रक्रिया न केलेला जैव-वैदयकीय कचरा** : (अनुसूची – ४ मध्ये दिलेल्या यादीनुसार) : प्रत्येक कचरा निर्माण करणा-याने असा कचरा विनिर्दिष्ट प्रकारच्या बंदिस्त कचरा पेटयात साठवून तो कचरा संकलित करण्यासाठी मुंबई महानगरपालिकेकडून किंवा महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून प्राधिकारित करण्यात आलेल्या अन्य कोणत्याही अभिकरणाद्वारे साप्ताहिक / ठराविक कालावधीने पुरविण्यात येणा-या कचरा संकलन वाहनात किंवा महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून जैविक वैदयकीय कचरा (व्यवस्थापन आणि हाताळणी) नियमावली, १९९८ नुसार अनिवार्य करण्यात आल्याप्रमाणे अशा कच-याची पध्दतशीर विल्हेवाट लावण्यासाठी तो कचरा संकलित करण्याकरीता नियोजित केलेल्या केंद्रांवर नेऊन दिला पाहिजे.

८. **बांधकाम आणि निष्कांसनातून निर्माण होणारा कचरा** : बांधकाम तसेच निष्कासनातून निर्माण होणारा कचरा, मुंबई महानगरपालिकेने असा कचरा गोळा करण्याठी नेमलेल्या व्यक्तीने, निर्देशित केलेल्या ठिकाणी व निर्देशित केलेल्या वेळात साठविला व सुर्पूद केला पाहिजे. छोटया प्रमाणावर म्हणजे घरगुती पातळीवर असा कचरा निर्माण करणा-यांनी, त्याचे जागीच वर्गीकरण करून महानगरपालिकेच्या मदत क्रमांकावर दुरध्वनी करून अथवा असा कचरा गोळा करण्यासाठी नेमलेल्या व्यक्ती अथवा संस्थेशी संपर्क साधून, हा कचरा सुपूर्द करावा व त्याच्या वाहतूकीचे शुल्कही संबंधितांना द्यावे. महापालिकेच्या मदत क्रमांकाचे तपशील पालिकेच्या विभाग कार्यालयांमध्ये उपलब्ध होतील.

९. **इतर सर्व अविघटनशील (सुका) कचरा** : पुनर्चक्रांकित आणि अपुनर्चक्रांकित - या उपविधितीलनियम क्र. ५..१.१ मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे प्रत्येक कचरा निर्माण करणा-याने हा कचरा साठवून तो, अशा प्रकारचा कचरा संकलित करण्यासाठी संबंधित सहाय्यक आयुक्तांनी वेळोवेळी अधिसूचित केलेल्या ठिकाणी आणि वेळी, मुंबई महानगरपालिकेकडून किंवा तिच्या प्रतिनिधीकडून पुरविण्यात आलेला सुका कचरा संकलित करावयाच्या वाहनामध्ये किंवा अनुज्ञप्ती मिळालेल्या सुका कचरा वेगवेगळा करावयाच्या केंद्रावर नेऊन द्यावा. अविघटनशील सुक्या कच-याची हाताळणी महाराष्ट्र अविघटनशील घन कचरा (महापालिका हद्दीत योग्य व शास्त्रीय पध्दतीने संकलन, साठवणूक व विल्हेवाटीचे नियम) २००६ च्या नियम ३ (२) (१) नुसारच झाली पाहिजे.

१०. **मोठी उद्याने आणि बागबगीचामधील कचरा** : हा कचरा एकत्रित न करता ठेवला पाहिजे आणि त्याचे उगमस्थानी खतात रूपांतर केले पाहिजे. संकलन अनुसूचीसह झाडांची छाटणी आणि साठवण करणे आणि ती नेऊन टाकणे, यासाठी उद्यान अधिक्षक किंवा संबंधित सहाय्यक आयुक्तांनी सूचना / मार्गदर्शक तत्वे अधिसूचित करावीत. ज्या ठिकाणी खतनिर्मिती करणे शक्य होणार नाही त्या ठिकाणी मुंबई महानगरपालिका, वेळोवेळी अधिसूचित करण्यात येणारे, योग्य शुल्क आकारून वर्गीकरण करण्यात आलेला, उद्याने आणि बागबगीचा, कचरा संकलित करणे आणि त्याचे परिवहन करणे चालू ठेवील.

११. **कचरा जाळणे** : रस्त्याच्या कडेला, किंवा कोणत्याही खाजगी किंवा सार्वजनिक मालमत्तेच्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचा घन कचरा जाळण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे.

तसेच उपविधी २००६ मध्ये याबाबतची विस्तृत माहिती उपलब्ध